निं.१२४ खाली आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी नं.४ ते ८ यांनीत्याच्याविरुध्द झालेला विनाकैफियतचा अर्ज रदद करण्यात यावा या करिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींचे म्हणणे असे की, प्रस्तुत प्रकरणांमध्ये प्रतिवादी नं.४ व ५ हे वयोवृध्द असून प्रतिवादी नं.६ ही त्यांची सून असून प्रतिवादी नं.७ व ८ ही अज्ञान नातवंडे आहेत. अशा परिस्थितीत प्रतिवादी यांचे वकील त्यांचे काही वैयक्तिक अपरिहार्य कारणामुळे मागील दोन तारखांना न्यायालयात हजर राहू शकले नाहीत. त्यामुळे त्यामुळे प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यासाठी विलंब झालेला आहे. सबब प्रतिवादीचा अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती केली.

३. प्रस्तुत अर्जावर वादीने म्हणणे दिले की, प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास उशीर झाला आहे. वादीने सदर विलंबास हरकत नोंदवली आहे. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

४. प्रस्तुतचा दावा गुणदोषावर चालविणेसाठी प्रतिवादीचे म्हणणे अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी नं.४ ते ८ यांना प्रस्तुतचा अर्ज करण्यास विलंब झालेला आहे. परंतु त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेली कारणे काही अंशी त्याने केलेला विलंब माफ करण्यायोग्य व समाधानकारक आहेत. तसेच प्रतिवादीचे म्हणणे अभिलेखावर घेतल्यास वादीस कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट सदरचा दावा गुणदोषावर चालविण्यास व न्यायदान करण्यास उपयुक्त होईल. प्रतिवादीने कैफियत दाखल करण्यास विलंब केलेला आहे ज्यामुळे वादीची गैरसोय झालेली आहे ज्याची भरपाई वादीस वाद खर्च देवून करता येईल.

५. प्रस्तुत प्रकरणामध्ये अद्याप मुददे काढण्यात आलेले नाहीत. त्यामुळे प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर घेतल्याने वादीच्या हितास बाधा होणार नाही. प्रतिवादी नं.४ ते ८ यांना दाव्यास त्यांचे म्हणणे देण्यास लक्षणिय विलंब झालेला आहे परंतु प्रतिवादीने नमुद केलेली कारणे व दाव्याची सध्यस्थिती लक्षात घेता सदरचा अर्ज

खर्चासहित मंजुर करणे योग्य आहे. म्हणून सर्वबाबी व परिस्थिती तसेच न्यायाचे उददिष्ट ध्यानात घेता, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे उचित होईल. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात आला:

<u>आदेश</u>

१. अर्ज (नि.१२४) मंजूर करण्यात आला.

२. दाव्यातील प्रतिवादी नं. ४ ते ८ यांना दाव्यास कैफियत देण्याची परवानगी देण्यात येते. तत्पूर्वी दाव्यातील, प्रतिवादी नं. ४ ते ८ यांनी वादीस रु.३००/- वाद खर्च द्यावा.

सही/-
(ह.उ.उ.पाटील)
२रे सह दिवाणी न्यायाधीश, भोर
जि.पुणे

दिनांक : १९/०३/२०२१

## Certificate

"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order.
Name of the Steno : A. A. Shaikh.
Court Name : H.U.U. Patil
2nd Jt. C.J.J.D., Bhor, Dist. Pune.
Date : 19/03/2021
Order signed by presiding officer on : 19/03/2021
Order uploaded on :22/03/2021.